# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./१४६/२०२० दि.२६/०२/२०२०

## परिपत्रक

**विषय :- राष्ट्रगीताचे गायन करण्याबाबत...**

संदर्भ :- शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६०/विशि-३, दिनांक १५/०२/२०२०

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ, विद्यापीठातंर्गत पदव्युत्तर शैक्षणिक विभाग तसेच विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्रातील उच्च शिक्षण घेणाऱ्या युवा विद्यार्थ्यांच्या मनातील राष्ट्रभावना जागृत ठेवण्याच्या दृष्टीने, राष्ट्रीय एकात्मतेची भावना रूजविण्याकरीता व देशाभिमानाचे युवा पिढीमध्ये संवर्धन करण्याकरीता शैक्षणिक संस्थांद्वारे विशेष प्रयंत्न करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती जागृत व्हावी व राष्ट्राप्रती नमन करण्याची संधी प्रत्येकाला प्राप्त व्हावी या उदात्त हेतुने, संलग्नित संदर्भीय पत्राचे अवलोकन करून निर्देशीत दिशा निर्देशांचे पालन व अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने आपल्यास्तरावर आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
कुलसचिव

सहपत्र :- संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) मा. सर्व विभागप्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
यांना विनंती करण्यात येते की, सदरहु परिपत्रक आपल्या विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना निर्दशनास आणुन द्यावे.

(डॉ. गोविंदप्रसाद दुबे)
उपकुलसचिव

D:\Circular\College circular\Circular/69

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित/ कायम विना अनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था तसेच तंत्र शिक्षण संचालनालयाच्या व कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व तत्सम शैक्षणीक संस्था यातील विद्यार्थ्यांचे दैनंदिन अध्ययनवर्ग सुरु होण्यापूर्वी, विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीताचे गायन करण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण - २०२०/प्र.क्र.६०/विशि-३,**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: १५ फेब्रुवारी, २०२०.

परिपत्रक:-

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण घेणाऱ्या युवा विद्यार्थ्यांच्या मनातील राष्ट्रभावना जागृत ठेवण्याच्या दृष्टीने, राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजविण्याकरीता व देशाभिमानाचे युवा पिढीमध्ये संवर्धन करण्याकरिता शैक्षणिक संस्थांव्दारे विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

(१) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/ विना अनुदानित/कायम विना अनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था, तसेच तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत विद्यार्थ्यांचे दैनंदिन अध्ययनवर्ग सुरु होण्यापूर्वी, विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीताचे गायन करावे.

(२) स्नेह संमेलने, वर्धापन दिन, समारोप समारंभ, सामूहिक उपक्रम, चर्चासत्र, शिबीर, विविध विषयांबाबतचे परिसंवाद, वादविवाद स्पर्धा इत्यादी आयोजित कार्यक्रमांची सुरुवात राष्ट्रगीत गायनाने करण्यात यावी.

(३) सर्व संचालक व संबंधीत विद्यापीठे यांनी त्यांच्या अधिनस्त महाविद्यालये/तंत्रनिकेतने/ परिसंस्था यांना उपरोक्त सूचना आपल्या स्तरावरुन तात्काळ कळविण्यात याव्यात. तसेच सर्व महाविद्यालये/तंत्रनिकेतने/ परिसंस्था यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

२. उपरोक्त निर्देशांचे सर्व शैक्षणिक संस्थांकडून काटेकोरपणे पालन करण्यात यावे. याबाबत संबंधित संस्थेचे प्राचार्य/ सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांनी वैयक्तिक लक्ष देऊन खात्री करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२००२१७१७२६४३४६०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish Jagdeorao Tidke

Digitally signed by Satish Jagdeorao Tidke DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=abbed5066527734e8508d93a5947... cn=Satish Jagdeorao Tidke Date: 2020.02.17 17:28:31 +05'30'

**( सतिश तिडके )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
३. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे, जि. रायगड.
५. कुलसचिव, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.
६. कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
७. कुलसचिव, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
८. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
९. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. संचालक, कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१२. उप सचिव (विशि/मशि/तांशि/साशि), उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (विशि-३).